## पाण्याचे सुयोग्य नियोजन

- सोयाबीन पिकांमध्ये रोप फूलोज्याची व शेंगा भरण्याची अवस्था या पाण्याच्या ताणास संवेदनशील आहेत.
- या कालावधीत १२ ते १५ दिवस पावसाची उघडीप झाल्यास पिकास संरक्षित पाणी दयावे.
- रुंद सरी वरंबा पध्दतीने पेरणी केल्यास चार ओळीनंतर चर काढलेले असल्यासमुळे जास्तीचा पाऊस झाल्यास पाणी पिकांत साचून राहणार नाही.

## किड व रोग व्यवस्थापन

- महाराष्ट्रात सोयाबीन पिकांवर प्रामुख्याने चक्रिभुंगा, उंटळी, तंबाकुवरिल पाने खाणारी अळी, केसाळ अळी, पाने पोखरणारी अळी, पांढरी माशी, तुडतुडे या किंडीचा प्रादुर्भाव आढळून येतो.
- चारकोल रॉट, पानावरील ठिपके व शेंग करपा या रोगांचा प्रादुर्भाव आढळून येतो.
- सोयाबिन पिकावरील किडींची आर्थिक नुकसानीचा पातळी ओळखून एकात्मिक किड व्यवस्थापनाचस अवलंब करावा.
- रोग व किडांचा अभ्यास करुन शिफारस केलेल्या किटकनाशकाची फवारणी करावी

**फवारणीसाठी वापरावयाची किडकनाशके**

| किडी | किटकनाशक | प्रमाण २० लि.पाणी |
|---|---|---|
| योडमाशी व चक्रिभुंगा | ट्रायझोफॉस ४०%<br>क्लोरॅन्ट्रानीलीप्रोलील १८.५%<br>फोटेट १०जी | १३ मि.ली.<br>३ मि.ली.<br>१० कि/हे. |
| पाने गुंडाळणारी अळी, केनाळ अळी, उंट अळी | प्रोफेनोफॉस ९०%<br>इमामेक्टिन बेन्झाफर ५%<br>लॅमडा सायटॅलोथ्रीन ५% | २० मि.ली.<br>३ ग्रॅम<br>१० मि.ली. |

## काढणी व मळणी

- शेंगा पिवळया पडून पक्व होताच पिकाची काढणी लवकर करावी.
- कापणी नंतर पिकांचे छोटे ढीग करुन २-३ दिवस उन्हात चांगले वाळवून मळणी करावी.
- मळणी करताना बियाण्यातील आर्द्रता १४% पर्यंत असेल तर मळणी यंत्राचया फेऱ्यांची गती ४०० ते ५०० फेरे प्रति मिनीट इतके ठेवावे.





**संकलन**

**श्री. मताई पी.डी.**
शास्त्रज्ञ, कृषि विद्या

**डॉ. डिग्रसे एस.एस.**
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख

**प्रकाशक**
वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख, लातूर

**स्त्रोत : वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी**

# सोयाबीन लागवड तंत्रज्ञान



PoCRA

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पोकरा)
व
**मांजरा कृषि विज्ञान केंद्र, लातूर**

# सोयाबीन
## लागवड तंत्रज्ञान



सोयाबीन हे जगातील प्रमुख तेलबिया तसेच कडधान्य पिक आहे. सोयाबिनमध्ये १६.२१% तेल व ३६.४२% प्रथिनांचे प्रमाण आहे. काढणीच्या वेळेस होणारा पाऊस, मान्सुनचे उशिरा आगमन व लवकर माघारी फिरणे, पर्जन्यमानातील घट सोबतच वाढलेले तापमान इ. विविध कारणांमुळे सोयाबिनचे उत्पादनात घट येत आहे. या सर्वसोबतच सुधारीत तंत्रज्ञानाचा वापराचा अभाव हे सुध्दा घटत्या उत्पादकतेचे एक महत्वाचे कारण आहे. खालील बाबीचे काळजीपूर्वक नियोजन करुन सोयाबीनची लागवड केल्यास चांगले उत्पादन घेता येईल.

### यशस्वी सोयाबीन लागवडीची सुत्रे

१. जमिन व हवामान
२. सुधारीत वाणांचा वापर
३. बिजप्रक्रिया व जिवाणु संवंधकाचा वापर
४. पेरणीची योग्य वेळ
५. रासायनिक खतांचा वापर
६.पाण्याचे योग्य नियोजन
७. किड व रोग व्यवस्थापन
८. काढणी मळणी व साठवणूक

### जमिन व हवामान

- मध्यम ते भारी प्रकारच्या जमिन लागवडीसाठी निवडावी.
- जास्त आम्लयुक्त, क्षारयुक्त तथा रेताड जमिनीत सोयाबिनचे पिक घेऊ नये
- जमिनीत सेंद्रीय कर्बाची मात्रा चांगल्या प्रमाणात असली पाहिजे

### सुधारीत वाणांचा वापर

| अ. क्र. | वाण | कालावधी (दिवस) | उत्पादन (क्वि/हे) | प्रमुख वैशिष्टये |
|---|---|---|---|---|
| १ | जे-एस-३३५ | ९५-९८ | २५-२८ | भारतात लागवडीसाठी सर्वाधिक क्षेत्र बॅक्टेरियल पुरण्यासाठी सहनशील |
| २ | एमएयुएस - ७१ | ९३-१०० | २८-३० | १२-१५ दिवस शेंगा तडकण्यास सहनशील जेएस - ३३५ पेक्षा १५% अधिक उत्पादन |
| ३ | एमएयुएस - १५८ | ९३-९८ | २६-३१ | खोडमाशी किडीसाठी प्रतिकारक १२ -१५ दिवस शेंगा तडकण्यास सहनशील |
| ४ | एमएयुएस - १६२ | १००-१०३ | २५-३० | मशिनव्दारा कापनिस योग्य |
| ५ | एमएयुएस - ६१२ | १००-१०५ | २६-२८ | तांबेरा रोगांसाठी सहनशील |
| ६ | डीएस - २२८ | ९५-१०० | २३-२४ | म.फूले राहूरी कृषि विद्यापीठ येथून प्रसारीत |

### बिजप्रक्रिया व जिवाणु संवर्धकाचा वापर

- पेरणीपूर्वी बियाण्यास थायरम किंवा कार्बेडेझिम ३ ग्रॅम/किलो बिजप्रक्रिया करावी.
- सोयाबीन हे हवेतील नत्र शोषून घेणारे पिक असल्यामुळे रायझोबियम + पीएसबी या जिवाणु संर्वधकाचवी २५० ग्रॅम /१० किलो बियाण्यास बिजप्रक्रिया करावी.

### पेरणीची योग्य वेळ

- सोयाबीनची पेरणी जुनच्या शेवटच्या आठवडा ते जूलैच्या दुसऱ्या आठवडयापर्यंत ७५ ते १०० मिमी पाऊस झाल्यानंतर करावी.
- जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करुनच पेरणी करावी.

### रासायनिक खतांचा वापर

- सोयाबीन पिकांसाठी हेक्टरी ३०:६०:३० किग्रॅ/हे नत्र स्फूरद, पालाश अधिक २० किग्रॅ गंधक पेरणी वेळेसच द्यावे.
- गंधकाचा वापर सोयाबीनसाठी अत्यंत आवश्यक आहे.
- पेरणीनंतर नत्रयुक्त खतांचा वापर टाळावा तसेच माती परिक्षण अहवालानुसार रासायनिक खतांची मात्रा कमी जास्त करावी.

